'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal | ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF)-6.261(2017), (CIF) -3.452(2015), (GIF) -0.676 (2013)
UGC Approved Journal Special Issue 66- | October. 2018

131

# भारतीय समाज व आदिवासी संस्कृती परंपरा

**डॉ. आर. एम. भिसे,**
समाजशास्त्र विभागप्रुख
दिगंबरराव बिंदू महाविद्यालय,
भोकर, जि. नांदेड

**प्रस्तावना :**

जगातील प्रत्येक समाजाची एक विशिष्ट संस्कृती असते. संस्कृतीशिवाय कोणत्याच समाजाची कल्पना करता येत नाही. कारण संस्कृती ही मानव समाजाचा अविभज्य अंग आहे. परंतु संस्कृती ही समाज सापेक्ष स्वरुपाची असते. समाज आणि स्वः यातुन जसे व्यक्तीमत्वं घडते त्याप्रमाणे समाजाचे चित्र संस्कृतीत दिसून येते. प्रत्येक समाजाची संस्कृती विकसनशिल जरी असली तरी ती चिरकाल टिकाणी आहे. कारण संस्कृती ही एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरीत केली जाते. म्हणून हजारो वर्षापासून भारतीय संस्कृती टिकून आहे. फक्त असे म्हटले जाते की, संस्कृती काळानुसार बदलते व त्या बदलासह हस्तांतरीत केली जाते. समाजातील संस्कार किंवा सामाजिकरणाच्या माध्यमातून संस्कृतीची शिकवण दिली जाते. प्रत्येक समाजाच्या संस्कृतीत काही परंपरा असतात आणि त्यांचे धारण करून जतन केले जाते. संस्कृतीचे दोन प्रकार आपण पाहतो. पण समाजशास्त्राचे दोन प्रकार आपण पाहतो. पण समाजशास्त्रज्ञ फक्त भौतिक व अभौतिक मानतात तर नैसर्गिकतेला दोन्ही मध्ये न स्थान दिल्याने तीसरा घटक लोक मानतात. उदा.- मानवनिर्मित सर्व वस्तू व ज्यांना स्पर्श करता येत नाही पण विचारांना आक्कलन होणारी मनोमय सृष्टी (संगित-आवाज) आणि पर्वत, नद्या महाकाय निसर्ग सौंदर्य इत्यादी संस्कृतीत येतात. समाजातील सदस्य मुर्त असनात परंतु त्या समाजातील प्रथा, रूढी, परंपरा, चालीरिती, अमुर्त असतात. म्हणून समाज सदस्य नष्ट होतात मात्र सांस्कृतिक परंपरा चिरकाल टिकूण राहतात. समाजातील प्रत्येक व्यक्ती आपल्या संस्कृतीला मान्य असणाऱ्या परंपरा प्रमाणे वर्तन करतात. समाजातील परंपरांचा भंग सहसा कोणी करत नाही. जर कोणी असे केले तर समाज त्यांना शिक्षा व निषेध देण्याचे काम करतात. निषेधाच्या रुपात असलेल्या परंपरांचे व्यक्तीला पालन करणे अनिवार्य आहे.

**आदिवासी भिल्ल यांची बाजार व्यवस्थेची संस्कृती :**

आदिवासी समुदायाला भारतीय समाजातील प्राचीन घटक मानले जाते. अगदी सिंधु संस्कृती पासून आदिवासी समाजाचा उल्लेख इतिहासात दिसतो. आदिवासींना मुळ भारतीय मानतात. खऱ्या अर्थाने त्यांच्यावर आर्यांचे आक्रमणे होऊन त्यांना जंगलात, दऱ्याखोऱ्यात, वनात पाठवलेले, त्याबद्दलचे अनेक ऐतिहासिक पुरावे आहेत. सद्य स्थितीत भारताच्या एकूण लोकसंख्येच्या १०% पेक्षा अधिक लोकसंख्या आदिवासी समाजाची आहे. महाराष्ट्रात सुमारे ९% लोकसंख्या असून ४७ जामती आहेत. या ४७ जमाती पैकी भिल्ली ही जमात असून संख्येने सर्वाधिक (१२ लाखांपेक्षा अधिक) आहे. या भिल्ल जमातीला खुप मोठा इतिहास आहे. कारण आपणास माहित आहे. भिल्लांना स्वतःची एक संस्कृती असून ती आजपर्यंत टिकवून ठेवलेली आहे. भिल्ल जमातीतील एक संस्कृतीक व्यवस्था इतर जमातींमध्ये नसलेली आहे. त्या संस्कृतीचा अभ्यास आपण येथे केलेला आहे. भिल्ल जमातीमध्ये इतर जमातींपेक्षा विभिन्न असलेली सांस्कृतिक परंपरा म्हणजे बाजार व्यवस्था. भिल्लांच्या बाजार व्यवस्थेची संस्कृती कशी आहे. तिची कार्य कोणती, तिची आवश्यकता का? हेही पाहणे आवश्यक आहे. ती खालील प्रमाणे ः

**गुलाल्या बाजार -**

प्रत्येक समाजाला जिवंत राहण्यासाठी विविध गरजा पुर्ण करण्याची गरज असते. त्या गरजा एका ठिकाणी राहून व एकाच व्यक्तीला पूर्ण करता येत नाही. म्हणून प्रत्येकाला प्राचीन काळापासून वैश्याच्या माध्यमातून विविध वस्तूंची खरेदी-विक्री केलेली उदाहरणे दिसून येतात. त्या प्रमाणे भिल्ल जमातीचे नंदुरबार जिल्ह्यात वास्तव्य असणाऱ्या क्षेत्रात ही आठवडी

बाजार भरणारी गावे आहेत. अशा गावांच्या आजूबाजूच्या सभोवती असलेले पाडे, गावे, वाड्या इत्यादीमध्ये राहणारे लोक बाजारासाठी (जीवन उपयोगी वस्तुंच्या खरेदीसाठी) जातात. अशाच आवठडे बाजारच्या गावी होळीच्या सणाच्या पंधरा दिवस अगोदर भरणार बाजार हा भिल्लांचा गुलाल्या बाजार होय.

गुलाल्या बाजार परिसरातील भिल्ल व अन्य जमाती होळीच्या सणासाठी लागणारे सामान खरेदी-विक्रीसाठी येतात. भिल्ल व अन्य जमातीतील वयस्कर मंडळी बाजारात आलेल्या ओळखीच्या पाहुण्यांच्या कपाळावर गुलाल लावून रामराम करतात व गळाभेट घेतात. प्रत्येकजन एकमेकांना ख्याली-खुशाली व अन्य प्रश्नांवर विचारना करतात. सर्वजन आपल्या ओळखीच्या प्रत्येकाला गुलाल लावतात म्हणून त्याला गुलाल्या बाजार म्हणण्याची संस्कृतिक परंपरा आहे.

संशोधकांसाठी हा बाजार ही महत्त्वाचा आहे. या बाजारात युवाग्रहाची जी कार्य आहेत, ती कार्य काही प्रमाणात पार पाडले जाते. म्हणून वधू-वर शोधले जाते. या बाजारात युवक-युवती एकमेकांना पसंत करतात. नंतर स्वतः किंवा वयस्कांच्या सहाय्याने लग्न जुळतात. याशिवाय जर एखाद्या तरुण-तरुणी पंसत असले तर तिच्या गालाला किंवा कपाळाला गुलाल लावला जातो. त्या दोघांची पसंत असेल तर ते दोघे लगेच पळून जावून लग्न करतात. तसेच जर तरुणांना तरुणी आवडली तर त्या तरुणातील स्वतः किंवा मित्राच्या सहय्याने गुलाल लावून पळवून घेऊन जाऊन लग्न केले जाते. परंतु त्यासाठी वधू दक्षिणा मात्रद्ध द्यावा लागत असे. भिल्ल जमातीत वधूला पळवून घेऊन येऊन लग्न करणे अभिमानाची बाब मानणारी संस्कृती आहे. परंतु अलिकडच्या काळात ही प्रथा कमी-कमी होत आहे. कारण काही प्रमाणात समाजात परिवर्तन झाले आहे. वधू मुल्ये देण्याची परंपरा बंद झालेली नाही.

**भोंगाऱ्या बाजार -**

गुलाल्या बाजारानंतर होळीच्या सणांच्या आगोदर आठ दिवसांचा येणारा आठवडी बाजार म्हणजे भोंगाऱ्या बाजार होय. या बाजार गावाच्या परिसरातील भिल्ली व अन्य जमातीचे लोक आपापल्या गावातील ढोल घेऊन येतात. बाजाराच्या गावी ढोल वाजण्यात सुद्धा मान असतो. ज्यांना मान असतो ते आपल्याला ढोल मिरवणुकीत सर्वात पुढे ठेवतात. त्यानंतर सर्व ढोल एकामागे एक असे गावातील मंदिरा पर्यंत जातात. प्रत्येक ढोल बरोबर त्या-त्या पाडातील किंवा गावातील पोलिस पाटील असतो पोलीस पाटील डोक्यावर फेटा बांधून, भारी भारी कपडे परिधान करतो, खाद्यांवर तलावार किंवा बंदूक घेतो, दुसरा व्यक्ती नवरदेवा प्रमाणे पोलीस पाटलाच्या डोक्यावर छत्री धरतो. अशी मिरवणूक मंदिरावर जावून पोलीस पाटलांच्या हस्तेपुजा होते. तिथे जमलेल्या ढोल्यांमध्ये स्पर्धा होवून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक काढून बक्षिस दिले जतो. या मिरवणुकित लोक त्यांनी तयार केलेल्या काढ्या, भाले, धनुष्यबाण, तलवार अन्य वस्तूंना घेवून नाचतात. या बाजाराची मिरवणुक पाहण्यासाठी परीसरातील खुप लोक येतात. संध्याकाळी चार-पाच वाजता आपापली ढोल व मंडळी पाड्यात परत जातात. आजही अशी प्रथम आहे, परंतु काही प्रमाणात याचे प्रमाण कमी कमी होत आहे. ज्या ज्या लोकांना शिक्षण व आधुनिकीकरणाचा गंध लागलेला आहे, त्यांनी या परंपराकडे जरा दुर्लक्ष केले आहे.

**रंगपंचमी -**

आदिवासी जमातींचा सर्वात मोठा सण म्हणून होळीला मानतात. भिल्ल व अन्य उपशाखांच्या परिक्षेत्रातील सर्वांची होळी झाल्यानंतर पाचव्या दिवसी रंगपंचमीचा उत्सव मोठ्या धुमधडाक्यात सुरु होतो. त्यानंतर **गोट खाण्याचा कार्यक्रम** असतो. रंगपंचमिच्या दिवसी आपल्या इतर समाजातील धुलीवंदनी प्रमाणे एकमेकांना गुलाल लावणे किंवा रंगाप्रमाणे गुलाल टाकणे, यात अबाल वृद्ध, स्त्री-पुरुष वर्षभरातील हे भांडण, तंटे, द्वेष, मत्सर विसरून रंगपंचमीचा आनंद घेतात. एकमेकांना रामराम घालून गळाभेट घेऊन होळीच्या शुभेच्छाही देतात. होळीचा सण झाल्यानंतर जवळपास एक आठ ते दहा दिवस आजूबाजूच्या पाड्यामध्ये होळी व गोटखाण्याचा कार्यक्रम साजरा करतात. आपल्या परिसरातील इतर पाड्यांच्या लोकांना निमंत्रण देवून बोलावून घेऊन रात्रभर दारू पिऊन नाचणे, गाणे, ढाले-वाद्य वाजवणे हे करून सकाळी जेवण दिले जाते. यात ही एक एक सांस्कृतिक परंपरा असते. पुजारी सर्वप्रथम होळीची पुजा करून होळीला दारू बकरा इत्यादीचा नैवद्य दाखवून कार्यक्रमाची सुरुवात करतात. त्यानंतर असंख्य बकऱ्यांना कापले जाते व एकत्र करुन त्यापासून काही लाडू

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal | ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF)–6.261(2017), (CIF) -3.452(2015), (GIF) –0.676 (2013)
UGC Approved Journal Special Issue 66- October. 2018

बनवतात आणि ते प्रसाद म्हणून वाटप करतात. उरलेले मटन वाटणी प्रमाणे वाटून घेऊन घरी जातात व प्रसाद म्हणून स्तवः व इतरांना खाऊ घालतात. ही रंगपंचमी जरी असली तरी बाजाराप्रमाणे सर्वांना आजूबाजूंच्या पाड्यातील लोकांना बोलावतात व त्या पाड्याला बाजाराचे रूप येते. या परंपरंचे स्वरुप आज इतर समाजातही आज खुप विस्तारलेले आहे.

**सारांश :**

भारतीय सभ्य समाजा प्रमाणेच आदिवासी समाजातही संस्कृतीला महत्त्वाचे स्थान आहे. कोणताच समाज संस्कृतीशिवाय नाही. त्या प्रमाणे प्रत्येक समुहाला, गटाला, समाजाला, समुदायाला, जाती, जमाती, धर्म इत्यादींना स्वतःची एक स्वतंत्र संस्कृती आहे. मात्र ती सापेक्ष आहे. नंदुरबार जिल्ह्यातील भिल्ल व अन्य जमातींमध्ये इतर आदिवासी जमातींप्रमाणे युवाग्रहाची संस्कृतीपणा दिसून येत नाही. तर त्या ऐवजी त्यांच्याकडे बाजार व्यवस्था आहे. बाजार व्यवस्थाच युवागृहाचे कार्य करते. बाजारात सर्वांच्या भेटी गाठी, ख्याली-खुशाली, लग्न जमवणे, लग्न लावणे, मुला-मुलींचे पळून जाणे इत्यादी येथे होतात. याशिवाय होळीच्या सणातील मुख्य ढोल, मिरवणुक, पुजाविधी होळीसाठी निमंत्रण व गोट खाण्याचा कार्यक्रम इत्यादी सांस्कृतिक पंरपरा दिसतात. जरी काही परंपरामध्ये परिवर्तन झाले असले तरी १००% परिवर्तन कधीच होत नाही. परिवर्तनासह संस्कृतीचे हस्तांतरण मात्र केले जाते.

**संदर्भ ग्रंथ :**

१. आगलावे प्रदिप - आदिवासी समाजाचे समाजशास्त्र - श्रीसाईनाथ प्रकाशन, नागपूर.
२. नाडगोंड गुरुनाथ - भारतीय आदिवासी - कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर, पुणे.
३. गारे गोविंद - आदिवासी प्रश्न आणि परिवर्तन - अमृत प्रकाशन, औरंगाबाद.
४. गारे गोविंद - सातपुड्यातील भिल्ल - कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर, पुणे.
५. गारे गोविंद - आदिवासी समस्या आणि बदलते संदर्भ - सुगावा प्रकाशन, पुणे.
६. www.indiantribal.com
७. www.wikipidiya.tribal.com